# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distress Situation**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **14/01/2022**

**Brief of the work done :-**

**@PSKaranjaCity येथे अल्पवयीन मुलीची छेडखानी करून विनयभंग करणाऱ्या आरोपीविरुद्ध फिर्यादीने दिलेल्या रिपोर्ट प्रमाणे विनयभंगाचा गुन्हा दाखल करून आरोपीस पो.नि.आधारसिंग सोनोने यांनी तातडीने अटक करून जेरबंद केले आहे. अशा प्रकारच्या तक्रारी देण्यासाठी महिलांनी समोर यावे.**

## ७१ वर्षीय घरमालकाकडून १३ वर्षीय मुलीवर अत्याचार

देशोन्नती वृत्तसंकलन...

- कारंजा येथील घटना
- आरोपीस अटक

**कारंजा** शहरातील बालाजी नगर परिसरात रहिवासी असलेल्या १३ वर्षीय मुलीवर ७१ वर्षीय वृध्द इसमाकडून अत्याचार झाल्याची घटना १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. सदर प्रकणी शहर पोलिसांनी पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पिडीतेची आई आपले पती व मुलींसह शहरातील बालाजी नगर १ मध्ये श्रीकृष्ण दौलतराव तायडे यांचे घरी तिन वर्षा पासुन भाडयाने राहते व घरकाम करते. यातील आरोपी म्हणजेच घरमालक श्रीकृष्ण दौलतराव तायडे वय ७१ रा.बालाजी नगर. १ यांच्या पत्नी आठ दिवसांपुर्वी बाहेर गांवी फिरायला गेल्या. त्यावेळी फिर्यादी हिला आरोपीची पत्नी हिने आरोपीकडे लक्ष ठेवण्याचे सुचविले होते. व आरोपी हा वयोवृध्द असल्याने व ते घरी एकटेच असल्याने फिर्यादी व तिच्या मुली आरोपीचे घरी विचारपुस करण्यास जात होते. १२ जानेवारीला सायंकाळी यातील फिर्यादी हिच्या दोन्ही मुली आरोपीकडे गेल्या असता अंदाजे साडे ६ वाजताच्या दरम्यान फिर्यादी हिला मोठ्या मुलीच्या रडण्याचा आवाज आल्याने फिर्यादी हिने जावुन पाहीले असता पिडीत मुलीने फिर्यादी हिला मी तायडे आजोबा कडे गेले व देवा जवळ दिवा लावत असतांना तायडे आजोबा यांनी माझ्यावर अत्याचार केला.असे सांगून पिडीतीने आपबिती सांगीतली. अशा आशयाच्या फिर्यादीवरून आरोपी घरमालक श्रीकृष्ण दौलतराव तायडे याचे विरुध्द कलम ३५४, ३५४ अ. भा.द.वि सहकलम ८, बालकांचे लैगींक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२,कलम ३ मधील सहकलमानुसार तसेच अनुसुचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधिक कायदा अधिनियम १९८९ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली. घटनेचा तपास पोलीस निरीक्षक आधारसिह सोनोने करीत आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून आजोबा समान असणाऱ्या वृद्ध व्यक्तीने माणूसकीला काळीमा फासणारे कृत्य केल्याने आता विश्वास ठेवावा कोणावर असा प्रश्न निर्माण झाला आहे. (ता.प्र.)

लोकमत

## ७१ वर्षीय नराधमाने केला भाडेकरू अल्पवयीन मुलीवर अत्याचार!

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा** : शहरातील भाडेकरू असलेल्या कुटुंबातील १३ वर्षीय मुलीवर ७१ वर्षीय नराधम घरमालकाने अत्याचार केल्याची घटना दि. १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शहर पोलिसांनी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीचे कुटुंब आई-वडील व एका बहिणीसह कारंजा येथील एका नगरात भाड्याच्या घरात राहते. पीडित मुलीची आई घरकाम करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते.

आरोपीची पत्नी आठ दिवसांपूर्वी बाहेरगावी गेल्याने पीडित महिलेच्या आईस घराकडे लक्ष ठेवण्याचे सांगितले होते.

त्यानुसार दररोज विचारपूस केली जात होती. १२ जानेवारी रोजी सायंकाळ दरम्यान दोन्ही मुली आरोपीकडे विचारपूस करण्याकरिता गेल्या असता आरोपीने मोठ्या मुलीवर अत्याचार केला.

ही बाब पीडित मुलीने आईस सांगितल्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी आरोपिविरुद्ध कलम ३५४, ३५४ अ, बालकांच्या लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

Hello Washim
Page No. 4 Jan 15, 2022
Powered by: erelego.com